# ई - पोलीस पत्रिका

दि १६/१२/२०२२ अनु.क्र. २३१

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/मपोना-२९९ तायडे + १/१३८२७/२०२२ अमरावती शहर दि. १७/११/२०२२**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/मपोना-२९९ तायडे + १/ ३१३०/२०२२ अमरावती शहर, दिनांक ३०/०३/२०२२

**कसुरदारचे नाव :-** १) मपोना/२९९ अनिता तायडे, २) मपोना/२११ कविता सिरसाट, सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही १) मपोना/२९९ अनिता तायडे, २) मपोना/२११ कविता सिरसाट, सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन आपण महिला सेल येथे नेमणुकीस असतांना प्रकरण क्रमांक ४५८/२०२१ मधील अर्जदार सौ पुजा पियुष लोखंडे व गैरअर्जदार पियुष संजय लोखंडे यांचे बाबतचे संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की पुजा पियुष लोखंडे यांनी पोलीस स्टेशन राजापेठ येथे त्यांचे पती श्री पियुष लोखंडे + ३ यांचे विरुध्द कौटुबिक कलहाबाबत जबानी रिपोर्ट दिल्याने सदरचा तक्रार अर्ज चर्चा व चौकशी करीता दिनांक ०४/०८/२०२१ रोजी महिला सेल येथे प्राप्त झाले. सदरचे तक्रार अर्ज दिनांक ०६/०८/२०२१ रोजी चर्चा/चौकशी व पुढील कार्यवाही करीता मपोना/२११ कविता शिरसाट यांचे कडे सोपविण्यात आले होते. त्यानुसार प्रकरण क्रमांक ४५८/२०२१ मधील अर्जदार पुजा पियुष लोखंडे व गैरअर्जदार पियुष संजय लोखंडे यांना फोनव्दारे माहिती देवुन दिनांक २४/०८/२०२१ रोजी चर्चेअंती अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील वाद न मिटल्याने त्यांना पुढील तारीख दिनांक ०१/०९/२०२१ देण्यात आली व तारखेच्या नोटीसवर अर्जदार व गैरअर्जदार यांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या. दिनांक ०१/०९/२०२१ रोजी गैरअर्जदार पियुष लोखंडे यांना सुट्टी न मिळाल्याने ते दिलेल्या तारखेवर हजर राहु शकणार नसल्याची माहिती फोनव्दारे व ई-मेल व्दारे महिला सेल यांना कळविले होते. परंतु प्रकरणातील रोजनिशी मध्ये ते गैरहजर असल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर पुढील तारीख १६/०९/२०२१ दिली असुन अर्जदार व गैरअर्जदार यांना नोटीस तामील केली असल्याबाबत कोणतीही स्वाक्षरी दिसुन येत नाही. तसेच रोजनामावर सुध्दा खाडाखोड दिसुन येत आहे. सपोनि शितल हिरोडे, महिला सेल यांचे बयाणानुसार दिनांक १६/१०/२०२१ रोजी प्रकरण क्रमांक ४५८/२०२१ मधील गैरअर्जदार पियुष लोखंडे याला फोन करुन माहिती दिली की तुमची पत्नी पुजा लोखंडे ही गुन्हा दाखल करणे संदर्भात तगादा लावत असुन त्यासंदर्भात चर्चा करणे करीता पुढील तारीख २०/१०/२०२१ दिली असुन तारखेवर हजर राहण्याबाबत कळविल्याचे सांगत आहे.परंतु पियुष लोखंडे यांनी नोटीस प्राप्त झाल्याशिवाय कुठल्याच तारखेवर येणार नसल्याचे सांगितले असुन दिनांक १५/१०/२०२१ रोजी पियुष लोखंडे यांनी महिला सेल चे ईमेल आयडी mahilacell.cpamt@mahapolice.gov.in यावर मेल करून त्यांच्याकडील पुरावे सादर तसेच दिनांक १६/१०/२०२१ रोजी महिला सेल येथील फोन नंबर ०७२१-२५५०१७५ वर फोन करून मपोना/२११ कविता शिरसाट यांचे सोबत बोलने करून पुढील तारखेबाबत विचारणा केल्याचे आपल्या बयाणात सांगत आहे.

दिनांक २०/१०/२०२१ रोजी च्या तारखे संदर्भात पियुष लोखंडे यांना नोटीस प्राप्त न झाल्याने ते तारखेवर हजर आले नाही व अर्जदार यांनी गुन्हा दाखल करणे संदर्भात सपोनि शितल हिरोडे यांना तगादा लावल्याने त्यांनी अर्जदार यांना मा.पोलीस उपायुक्त, परिमंडळ - २ यांचे समक्ष हजर केले असता, गैरअर्जदार पियुष लोखंडे यांना ईमेल व्दारे शेवटची नोटीस पाठवुन बोलावुन घ्या व प्रकरणाचा निपटारा करा असे आदेश दिल्याने सपोनि शितल हिरोडे यांनी पोना/१५४ राजेश यादव यांना नोटीस ईमेल व्दारे पियुष लोखंडे यांना पाठविण्याबाबत सांगितले असता सदरचे ईमेल हे पियुष लोखंडे यांना दिनांक २६/१०/२०२१ रोजी cp.thane@mahapolice.gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात आले. याबाबत पोना/१५४ राजेश यांचे बयाण नोंदविले असता त्यांनी आपल्या बयाणात सांगितले की,ते दिनांक २०/१०/२०२१ रोजी पो.नि.साहेबांच्या आदेशाने बदली साप्ताहिक रजेवर होते तसेच दिनांक २५/१०/२०२१ ते २७/१०/२०२१ पोवेतो पोलीस भरती बंदोबस्ताकरिता असल्याने त्यांनी या दरम्यान कार्यालयातील कोणतेही कामकाज केले नसल्याचे सांगितले. दिनांक ३०/१०/२०२१ रोजी पियुष लोखंडे हे नोटीस न भेटल्याने तारखरेवर हजर आले नसल्याचे मा.पोलीस उपायुक्त, परि-२ यांचे आदेशान्वये प्रकरण क्रमांक ४५८/२१ मध्ये गुन्हा दाखल करणेबाबत आदेश दिल्याने सदरचे प्रकरण हे पो.स्टे.राजापेठ यांचे कडे पुढील कार्यवाही करिता दिनांक ०२/११/२०२१ रोजी पोठविण्यात आले.

सदर बाबींवरून असे निदर्शनास येते की, महिला सेल येथे कार्यरत असलेले अधिकारी अंमलदार यांनी दिलेल्या बयाणात लिहीलेल्या रोजनिशीच्या तारखांमध्ये तफावत दिसुन येत आहे.तसेच प्रकरण क्रमांक ४५८/२१ मध्ये लिहीण्यात येणा-या रोजनिशी मध्ये तारखांमध्ये खाडाखोड करण्यात आली.असुन त्यावर अर्जदार व गैरअर्जदार यांच्या तारखेनिहाय स्वाक्षरी घेण्यात आले नसल्याचे दिसुन येत आहे तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांना तारखेसंदर्भात देण्यात आलेल्या नोटीस योग्यरित्या तामिल केले नसल्याचे दिसुन येत आहे. तक्रारदार पियुष लोखंडे यांनी त्यांचा पुर्ण पत्ता दिला असतांना सुध्दा त्यांना एकही नोटीस पोस्टाव्दारे पाठविण्यात आले नाही. तसेच पियुष लोखंडे त्यांना सदरची नोटीस ही cp.thane@mahapolice.gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात आल्याचे दिसत आहे. याबाबत सपोनि हिरोडे यांनी मेल बाबतचे संपुर्ण कामकाज हे पोना/१५४ राजेश यादव पाहत असल्याचे आपल्या बयाणात सांगितले आहे.परंतु पोना/१५४ राजेश यादव हे नमुद तारखेस कार्यालयात नसल्याचे सांगत आहे.यावरून महिला सेल येथील अधिकारी व अंमलदार यांच्यातील कार्यालयीन कामकाजातील मतभेद स्पष्टपणे दिसत आहे. त्याप्रमाणे तक्रारदार पियुष लोखंडे यांनी आपल्या तक्रार अर्जात तसेच बयाणात नमुद केले आहे की,दिनांक १६/०९/२०२१ रोजी त्यांना महिला सेल येथिल महिला अंमलदार मपोना/२९९ अनिता तायडे यांनी कार्यालयीन वेळेनुतर पियुष लोखंडे यांना पोलीस पेट्रोल पंप जवळ बोलावुन पियुष लोखंडे यांना सदर गुन्हयातुन तुझी आई व बहिण यांचे नावे कमी करून गुन्हयाच्या तपासात मदत करून देतो असे सांगुन वरिष्ठांकरिता रु ५०,०००/- रूपयाची मागणी केली असुन त्यावेळेस मपोना/२९९ अनिता तायडे यांचेसोबत मपोना/२११ कविता शिरसाट हयासुध्दा हजर होत्या. असे पियुष लोखंडे यांनी आपल्या बयाणात सांगितले असुन त्याबाबत तक्रारदार पियुष लोखंडे यांनी तक्रारीत नमुद केलेले मोबाईल क्रमांक तसेच महीला सेल येथील मपोना/२९९ अनिता तायडे यांचे मोबाईल क्रमांक ७९७२५६९९९० व मपोना/२११ कविता शिरसाट यांचे मोबाईल क्रमांक ७०२००३०३९८ यांचे दिनांक १६/०९/२०२१ रोजीचे टॉवर लोकेशन सायबर पोलीस स्टेशन यांचे कडुन प्राप्त केले असता असे निदर्शनास येते की, पियुष लोखंडे यांनी त्यांचे तक्रारीत नमुद केलेले त्यांचे मोबाईल क्रमांक ८४५२९९६३७७ व ८८९८८५७०४७ चे लोकेशन हे आय.एम.ए. हॉल येथील दाखवत असुन मपोना/२११ अनिता तायडे यांचे मोबाईल क्रमांकम ७९७२५६९९९० व मपोना/२९९ कविता शिरसाट यांचे मोबाईल क्रमांक ७०२००३०३९८ चे टॉवर लोकेशन हे एकाच ठिकाणचे म्हणजेच हॉटेल मेहफिल इन हे दाखवत आहे. त्यामुळे दिनांक १६/०९/२०२१

रोजी पियुष लोखंडे, अनिता तायडे व कविता शिरसाट हे एकाच ठिकाणी हजर असल्याचे समजते. याबाबत त्याच्या केलेल्या अर्ज चौकशीमध्ये सीध झाले.

तसेच दिनांक २८/११/२०२१ रोजी मपोना/२९९ अनिता तायडे यांनी पियुष लोखंडे यांनी यांनी त्यांचे विरुध्द दिलेल्या तक्रार अर्जाबाबत माहिती झाल्याने पियुष लोखंडे यांचे मामाच्या घरी जावुन त्यांचे आजी-आजोबा व मामा-मामी यांना सदर तक्रार परत घेण्याकरीता धमकी दिल्याचे तुमच्या बयाणात सांगितले असुन त्याबाबत पियुष लोखंडे यांचे मामा कुंदन नितनवरे रा.बापटवाडी, अमरावती यांचे बयाण नोंदविले असता त्यांनी तुमच्या बयाणात सांगितले की मपोना/२९९ अनिता तायडे हया त्यांचे मोठे भाऊ यांची साळी असुन त्यांचे नेहमीच घरी येणेजाणे सुरु असते. परंतु दिनांक २८/११/२०२१ रोजी त्या घरी आल्या असता त्यांनी माझे आई-वडिलांना व मला विनंती केली की तुम्ही पियुषला तक्रार परत घेण्याबाबत समजावुन सांगा याबाबत त्यांनी कुठलीही धमकी वगैरे दिली नाही. त्यामुळे पियुष लोखंडे यांनी आपल्या बयाणात धमकी दिल्याची बाब सिध्द होत नाही. तुम्ही तुमच्या कर्तव्यामध्ये वरिष्ठाचे मार्गदर्शन घेवुन अर्जदार व गैरअर्जदार यांना योग्यरित्या नोटीस देवुन तारखरेवर बोलविणे तसेच त्यांच्यातील मतभेद दुर न झाल्यास वरिष्ठांचे आदेशाने पुढील कार्यवाही करणे करीता आवश्यक असतांना सुध्दा तुम्ही पियुष लोखंडे यांना योग्य प्रकारे नोटीस दिल्या नसल्याने तक्रारदार पियुष लोखंडे हे तारखेवर हजर येवु शकले नाहीत. त्यांचे बाबत एकतर्फी अहवाल पाठविण्यात आल्याची कसुरीबाबत तसेच महिला सेल येथील वरिष्ठ अधिकारी व तुमच्यातील कार्यालयीन कामकाजातील समन्वय नसल्याचे कसुराबाबत तसेच हलगर्जीपणा व निष्काळजीपणा व हेतुपुरस्पर श्री पियुष लोखंडे यांनी त्यांचा पुर्ण पत्ता दिला असतांना सुध्दा तुम्ही एकही नोटीस पोस्टाव्दारे न पाठविता फक्त ई मेल व्दारे पाठविले असे दिसुन आले असुन तुम्ही तुमच्या कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशाप्रकारे आपण शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असुन सुध्दा आपल्या कर्तव्याप्रती बेशिस्तपणा केल्याचे निदर्शनास आले आहे. या आपल्या बेशिस्तपणाच्या व बेजबाबदारपणाच्या कसुरीबदल आपणास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्ती व समाधानकारक न वाटल्याने तुम्हास कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त नमुद कसुरदार यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **"देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**२. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/मपोना-१८८९ धाकडे + २ /१३८२३/२०२२ अमरावती शहर दि. १७/१२/२०२२**

**संदर्भ:-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौशाखा/कसुरी/दामिनी/मपोकॉ-१८८९+२/१२२६३/२०२२ अमरावती शहर, दिनांक २७/०९/२०२२

**कसुरदारचे नाव** :- १) मपोकॉ/१८८९ पल्लवी धाकडे, २) मपोकॉ/७९५ गिता झामरकर, ३) मपोकॉ/६३२ रेश्मा तांगले, सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही १) मपोकॉ/१८८९ पल्लवी धाकडे, २) मपोकॉ/७९५ गिता झामरकर, ३) मपोकॉ/६३२ रेश्मा तांगले, सर्व पोलीस पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची दिनांक २६/०९/२०२२ रोजी महिला सेल येथुन दामिनी पथक म्हणुन कर्तव्याकरीता पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर ची हद्द नेमणु देण्यात आली होती. सद्या सणोत्सवाचे दिवस असल्याने तुम्हास सकाळी ०९.०० वा. ते १४.०० वा. पावेतो तसेच १६.०० वा. ते रात्री २१.०० वा. पावेतो नेमणु दिलेल्या हद्दीत निरंतर पेट्रोलींग करण्याबाबत वरिष्ठांचे आदेश असतांना सुध्दा तुम्ही गाडगे नगर दामिनी क्रमांक - १ हे १६.०३ वा. पासुन ते १७.२२ वा. पावेतो पोलीस मुख्यालय येथे हॉल्ट होते. तसेच गाडगे नगर दामिनी क्रमांक - २ हे १६.०० वा. ते १७.१९ वा. पावेतो जुना बायपास येथे वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता किंवा नियंत्रण कक्ष येथे कुठलिही माहिती न देता परस्पर स्वमर्जीने हॉल्ट असल्याचे GPS लोकेशन वरुन दिसुन आले आहे.

अशाप्रकारे तुमची उपरोक्त नमुद कसुरी ही गंभीर स्वरुपाची व पोलीस खात्याच्या शिस्तिस न शोभनारी आहे. या तुमच्या कसुरी बाबत तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. सादर केलेले स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**३. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/म.सपोनि-हिरोडे/१३८२५/२०२२ अमरावती शहर दिनांक १७/१२/२०२२**

**संदर्भ :-** १) अर्ज शाखा यांचे पत्र क्र. पोआअ/अर्ज शाखा/६१०७/२०२२ अम. शहर, दिनांक ०२/०६/२०२२ अन्वये सदर प्रकरण विभागीय चौकशी शाखेस दिनांक ०६/०६/२०२२ अन्वये (प्राप्त) वर्ग करण्यांत आले आहे.

२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो./सपोनि शितल हिरोडे/६६४४/२०२२ अमरावती शहर, दिनांक १६/०६/२०२२

**कसुरदारचे नाव :-** सपोनि शितल हिरोडे, नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रति कक्ष, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही शितल हिरोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, सध्या नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रति कक्ष, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन महिला सेल, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे कार्यरत असतांना अर्जदार श्री पियुष संजय लोखंडे रा. ए.७०४, देवदर्शन बिल्डींग अडेश्वर पार्क ठाणे यांनी केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने तुम्ही तक्रारदार यांना तिस-या समुपदेशना करीता महिला सेल येथे न बोलाविता त्यांचे प्रकरण परस्पर पो.स्टे. राजापेठ येथे पाठविल्याने त्यांचेवर पो.स्टे. राजापेठ येथे खोटा गुन्हा दाखल झाला असे त्यांचे मत आहे.

परंतू तुम्ही तुमचे जबाबात सांगीतल्याप्रमाणे दिनांक २०/१०/२०२१ रोजी पियुष लोखंडे यांच्या पत्नी पुजा पियुष लोखंडे यांनी त्यांचे प्रकरणात आणखी समुपदेशन न करता गुन्हा दाखल करण्यासाठी लेखी अर्ज दिल्याने त्यांना पोलीस उपायुक्त (परि.-२) यांचे समक्ष नेले असता पोलीस उपायुक्त (परि.-२) यांनी तुम्हाला सांगीतले की, गैरअर्जदार पियुष लोखंडे यांना एक शेवटची संधी म्हणून ई-मेलव्दारे नोटीस पाठवून व फोनव्दारे माहिती देवून पुढील समुपदेशनाकरीता हजर राहण्याबाबत कळवावे असे आदेश दिले होते. परंतू तुम्ही पियुष लोखंडे यांना नोटीस त्यांचे ई-मेल आयडीवर न पाठविता cp.thane@mahapolice.gov.in या ई-मेल आयडीवर पाठविण्यात आल्याचे दिसून येत आहे. याचाच अर्थ पियुष लोखंडे यांनी तक्रार अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांना तिसऱ्या समुपदेशनाकरीता कुठलीही नोटीस न देता व त्यांना समुपदेशनाकरीता न बोलाविता परस्पर अहवाल पो.स्टे. राजापेठ येथे पाठविला. तसेच त्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची दखल न घेता त्यांचे विरुध्द खोटा गुन्हा दाखल होत नसतांना सुध्दा, दाखल झालेला गुन्हा हा त्यांची पत्नी पुजा लोखंडे यांनी दिलेल्या फिर्याद नुसार झालेला आहे. सदरची बाब ही नियमास अनुसरुन नाही.

तसेच पियुष लोखंडे व पुजा पियुष लोखंडे यांचे महिला सेल येथे सुरु असलेल्या प्रकरणामध्ये पियुष लोखंडे यांना तिसऱ्या समुपदेशनाकरीता हजर राहण्याबाबतची नोटीस ई-मेल व्दारे पोना/१५४ राजेश यादव यांनी पाठविली किंवा नाही याबाबत पाठपुरावा न केल्याने सदरची नोटीस पियुष लोखंडे यांना न पाठविता cp.thane@mahapolice.gov.in यांना पाठविण्यात आली. त्यामुळे पियुष लोखंडे यांना नोटीस प्राप्त न झाल्याने ते तिसऱ्या समुपदेशना करीता गैरहजर राहीले. तसेच तुम्ही मा. पोलीस उपायुक्त (परि.-२) यांनी

आदेश देवून सुध्दा त्याकडे दुर्लेक्ष करुन वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना केली. त्यामुळे अर्जदार यांना पोलीसांविरुध्द तक्रार करण्यास संधी प्राप्त झाली. तुम्ही पोलीस विभागात अंत्यत महत्वाचे पदावर कार्यरत असून सुध्दा आपल्या कर्तव्यात अत्यंत बेजबाबदार व निष्काळजी व हलगर्जीपणा करुन कर्तव्यात कसुरी केलेली आहे. तुमच्या अशा बेजबाबदार व निष्काळजी व हलगर्जीपणाचे कृत्यामुळे इतर कर्मचारी यांचेवर सुध्दा आपला वचक दिसून येत नाही. तुम्ही बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केलेला असल्याचे दिसुन आले आहे.

अशाप्रकारे तुम्ही शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असुन सुध्दा तुमच्या कर्तव्याप्रती बेशिस्तपणा केल्याचे निदर्शनास आले आहे. या तुमच्या बेशिस्तपणाच्या व बेजबाबदारपणाच्या कसुरीबदल तुम्हाला मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम ५ (२) च्या प्राधीकारानुसार आपणास **रु.१०००/- दंडाची शिक्षा का करण्यात ? येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात** आली होती. सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही दिनांक २७/०६/२०२२ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्ती व समाधानकारक न वाटल्याने तुम्हास कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त नमुद कसुरदार यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु.१०००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस